# महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, वर्धा

## दरपत्रक सूचना क्रमांक -२ /२०२५-२०२६ वर्धा

महिला व बाल विभाग, जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत सन २०२५-२०२६ वर्षाकरिता जि.प. स्वउत्पनाच्या निधी मधुन खालील योजना राबविण्याच्या अनुषंगाने शासन मान्यता प्राप्त फर्मकडून बंद लिफाफ्यात सर्व करासहीत शासनाच्या **www.zpwardha.in** या संकेतस्थळावर स्पर्धात्मक पध्दतीने दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | योजना | तांत्रिक विवरण.अंगणवाडयांना साहित्य व सुविधा पुरविणे ((प्लॅास्टीक खुर्ची )) | | | तरतुद रु.लाखात | ईसार रक्कम EMD | दरपत्रक अर्ज किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडयांना साहित्य पुरविणे (प्लॅास्टीक खुर्ची ) | Sr.No. | PARAMETER | REQUIREMENT | जि.प. सेस फंड - १०,००,०००/- एकूण तरतुद - १०,००,०००/- | २०,०००/- | ४०००/- |
| | | S.NO | perticulers | REQUIREMENT | | | |
| | | 1 | MATERIAL | VIRGIN POLYPROYLENE | | | |
| | | 2 | WEIGHT | 600 GRAM | | | |
| | | 3 | OVERALL LENGTH OF CHAIR | 33 CM | | | |
| | | 4 | OVERALL WIDTH OF CHAIR | 25 CM | | | |
| | | 5 | OVERALL HEIGHT OF CHAIR | 38 CM | | | |
| | | 6 | HEIGHT OF LEG | 15 CM | | | |
| | | 7 | SEATING AREA | 30 CM X22 CM | | | |
| | | 8 | A BABY DRIVING CAR PHOTO PRINT ON SEATING AREA | | | | |

**अ) दरपत्रक अटी व शर्ती :-**

1 दरपत्रक सुचना व इतर आवश्यक माहिती सादर करण्याचा कालावधी दिनांक / /२०२५ वेळ १०-०० वाजता ते दिनांक / /२०२५ वेळ ५-०० वाजे पर्यंत राहील.कार्यालयीन वेळेत.

2 दरपत्रक दिनांक / /२०२५ वेळ दुपारी २-०० वाजता उघडण्यात येईल .

3 दरपत्रक सादर करण्याचा कोणत्याही अटी व शर्ती सह सादर करु नये.

दरपत्रक सादर करतांना दरपत्रक शुल्क फी रु ४,०००/- व ईसार रक्कम रु.२०,०००/- (EMD) धनादेशाद्वारे दरपत्रकासोबत सादर करावी.(दरपत्रक शुल्क नापरतावा राहील)

A. जी एस टी नोंदणी प्रमाणपत्र व दिनांक ३१/०३/२०२५ अखेरपर्यंत जी एस टी भरणा केलेले प्रमाणपत्र(Acknowledgement)किंवा नो ड्युज प्रमाणपत्र जोडावे.

B. शॉप ॲक्ट नोंदणी प्रमाणपत्र (चालू वर्षाचे) किंवा नगरपालिका किंवा ग्रामपंचायत चे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

C. दरपत्रक धारकाच्या पॅन कार्ड ची प्रत जोडणे आवश्यक आहे.

D. दरपत्रक धारक Black Listed नसल्याबाबत Schedule -Aप्रमाणपत्र.

E. पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्यांच्या कंपणीचे नाव व मॉडेल नमुद करण्यासाठी Schedule -B.

1. बी. ओ. क्यु (BOQ) मध्ये साहित्यांची किंमत कर व वाहतुकीच्या सर्व खर्चासह नमुद करण्यात यावे.

2. तांत्रिक लिफाफ्यामध्ये मुद्दा क्र. A ते E पर्यंतचे सर्व आवश्यक ५ ...पत्र दरप ...क अंतिम वेळेपर्यंत या कार्यालयास करणे आवश्यक आहे.

3. दरपत्रकामध्ये सादर केलेले सर्व कागदपत्र बरोबर असल्यावरच बी. ओ. क्यु (BOQ) दराचे व्यापारी दर उघडण्यात येईल.

4. नमुना तपासणी शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय/औद्योगिक प्रशिक्षण संस्था किवा पॉलिटेक्नीक कॉलेज इतर सक्षम संस्थेमार्फत करुन घेण्यात येईल.दिनांक ०१/१२/२०१६ चे शासन निर्णयानुसार ६.१२ परिशिष्ट -१२ नुसार समाविष्ट संस्थेमार्फत नमुना तपासणी करुन घेण्यात येईल. तपासणी शुल्क दरपत्रकधारकास अदा करावी लागेल. नमुना साहित्याच्या तांत्रिक तपासणी बाबत कोणतेही किंवा कसलेही प्रकारचे म्हणने / तक्रार विचारा घेतल्या जाणार नाही.

5. दरपत्रक स्विकृत झाल्यानंतर सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना पुरवठा झालेल्या साहित्य मधुन एक (RANDOM) नमुन्याची तांत्रीक तपासणी इतर सक्षम संस्थेमार्फत करुन घेण्यत येईल. सदर तपासणी साहित्य योग्य दर्जाचे असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयकाची अदायगी करण्यात येईल. तपासणी शुल्क दरपत्रकधारकास अदा करावा लागेल.

6. सर्व प्रकारचा वाहतुक खर्च, जकात कर, इत्यादींचा अंतर्भाव करुन दर गृहित समजण्यात येईल. मंजूर झालेल्या दरा शिवाय कोणताही वाढीव दर देण्यात येणार नाही.

7. दरपत्रक धारकास बयाणा रक्कम भरणेतून सवलत मिळाली असल्यास तसे शासनाच्या सक्षम अधिकाऱ्याचे या साहित्याचा उल्लेख असलेले (मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई अथवा DCGS & D नवी दिल्ली यांचे) अद्यावत तारखेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

8. मंजूर झालेले दर दि. ३१/०३/२०२६ पर्यंत मान्य राहतील मालाचा पुरवठा वर्क ऑडर दिल्या पासुन ४५ दिवसाच्या आत करावा लागेल. त्या नंतर त्या मालाचा पुरवठा विलंबाने झाल्यास दर आठवडा १/२ (अर्धा )% व जास्तीत जास्त ५% दंड आकारण्यात येईल. दंड आकारण्याचे अधिकार मा. मु.का.अ. यांना राहिल.

9. दरपत्रक प्रक्रिया सुरु असतांना किंवा पुरवठा आदेश देण्यापूर्वी जर शासनाकडुन, दिलेल्या आकारामानाप्रमाणे दर करार प्राप्त झाल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार तसेच दरपत्रक मंजूर / नामंजूर करण्याचे तसेच रद्द करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. वर्धा यांना राहिल.

10. सदर कामाच्या दरपत्रक अटी व शर्तीमध्ये आवश्यकता वाटल्यास अशंत:हा किवा पुर्णत:हा बदल करण्याचे त्याचप्रमाणे कार्यालयाने सुरु केलेली खरेदी प्रक्रिया दरपत्रक कोणत्याही टप्यावर मंजूर / नामंजूर अथवा पुर्णत:हा रदद करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वर्धा यांनी राखुन ठेवले आहे.

11. साहित्यांचा नमुना दरपत्रक भरण्याच्या तारखेच्या अंतिम वेळे पर्यंत महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद वर्धा यांच्या कार्यालयात आणून देणे बंधनकारक आहे. अन्यथा आपली दरपत्रक उघडण्याची कार्यवाही होणार नाही.

**ब) साहित्य पुरवठाच्या अटी व शर्ती :-**

1. पुरवठा आदेशानुसार नमुद केल्या प्रमाणे करारा प्रमाणे साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक राहिल. अन्यथा साहित्य स्विकृत केल्या जाणार नाही.
2. साहित्याचा पुरवठा बाल विकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत जिल्हाअंतर्गत ९ प्रकल्पामध्ये ( वर्धा-१, वर्धा -२, हिंगणघाट, सेलू, देवळी, समुद्रपुर, आर्वी, आष्टी , कारंजा ( घाडगे ) येथे अंगणवाडीकेंद्रापर्यंत पोहचता करावा लागेल. साहित्याचा पुरवठा केल्याबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना (सर्व) यांच्या साहित्य विनिर्देशित व चांगल्या प्रतिचे प्राप्त झाल्याबाबतचे प्रमाणपत्रासह दिनांकीत पोच पावत्या सादर कराव्या लागेल.
3. पुरवठा धारकास पुरवठा करावयाचे साहित्य स्वत:चे खर्चाने नेमून दिलेल्या ठिकाणी गोडाऊन मध्ये रचून द्यावे लागेल.
4. दर पत्रकात नमुद केलेल्या मंजूर दराव्यतीरिक्त इतर कोणताही खर्च अदा केल्या जाणार नाही.
5. साहित्याचे स्विकृतीचे वेळ हे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.१५ वाजे पर्यंत राहील आणि त्याच कालावधीत साहित्य स्विकारल्या जाईल.
6. साहित्य खरेदीचा पुरवठा आदेश निधीची उपलब्धता व साहित्यांच्या आवश्यक्ते नुसार देण्यात येईल.
7. उद्योग,उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दिनांक १ डिसेबंर २०१६ मधिल परिशिष्ठ -४ (ब) अंतर्गत १.Risk Purchase २. Fall Clause ३.Force Majeure Clause सदर पुरवठा दारास लागु राहिल.

**क) विलंबाने पुरवठ्याच्या अटी व शर्ती :-**

1. जर पुरवठाधारकाने नेमून दिलेल्या कालावधित साहित्याचा पुरवठा केला नाही तर पुरवठा करणे बाकी असलेल्या साहित्याच्या किमतीत १/२ (अर्धा )% प्रति आठवडा/ (महत्तम ५%) या दराने दंड आकारण्यात मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वर्धा हे सक्षम राहतील. सबळ कारण असल्यास मुदतवाढ देण्याबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. वर्धा हे सक्षम राहतील. तथापि मुदतवाढ देण्याचा हक्क मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वर्धा यांनी राखुन ठेवला असुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय बंधनकारक राहिल.
2. पुरवठादार साहित्य पुरवठा करण्यास असमर्थ अथवा पुरवठा धारकाने साहित्याचा विहित कालावधीत केला नाही. अथवा पुरवठा केलेल्या साहित्यामध्ये काही साहित्य विहित मुदतीत बदलुन दिले नाही तर मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वर्धा हे योग्य अशा कोणत्याही पुरवठा धारकाकडुन कोणत्याही किंमतीने उर्वरित साहित्याची खरेदी करण्यास सक्षम राहितील.
3. जेव्हा क्र. २ मध्ये नमुद केलेली कार्यवाही अमलात आणली जाईल तेव्हा कसुरदार पुरवठा धारकाची पुरवठा करण्याची तयारी विचारात घेतली जाणार नाही.
4. कसुरदार पुरवठा धारकास दोन्ही दरामधील किंमतीचा फरक अथवा १०% या दोन्ही पैकी जी रक्कम जास्त असेल तेवढ्या रक्कमेचा दंड आकारण्या येईल.
5. जर कसुरदार पुरवठाधारकाने दंड रक्कमेचा भरणा केला नाही तर त्यांनी भरणा केलेली सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल व संस्थेचे नाव काळ्या यादित टाकण्यासाठी प्रस्तावित करण्यात येईल.

**ड) प्रदान पेमेंट अटी व शर्ती :-**

1. पुरवठा धारकाने पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा केल्यास व कोणतेही तक्रार नसल्यास पुरवठादाराने स्पेशिफीकेशन नमुद करुन दिनांकीत पोच पावत्या व देयक दोन प्रतीत महिला व बाल कल्याण विभाग जि.प. वर्धा यांच्या कार्यालयात सादर कराव्या पुरवठा केलेल्या साहित्याची नमुना तपासणि अहवाल प्राप्त झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल.
2. बाल विकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी पोच पावत्या सादर केल्यानंतर मंजुर दरा प्रमाणे रक्कम अदा करण्यात येईल. तसेच मंजूर रक्कमेव्यतिरिक्त इतर कोणताही खर्च अदा केल्या जाणार नाही.
3. देयकाचे शोधन विविध लागु असलेले शासकीय कर (Income Tax , Tds ,Gst. Etc.) कपात करुन रक्कमेचेच प्रदान करण्यात येईल.

**इ) करारनामा :-**

1. जर (दरपत्रक) स्विकृत झाली तर अशा दरपत्रकधारकास मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वर्धा सोबत शासन निर्णयाच्या अधिन राहून योग्य त्या किंमतीच्या स्टँप पेपरवर करारनामा करुन घ्यावा लागेल. वरील अटी व शर्तीचा या करारनाम्यात समावेश राहील . तथापी करारनामा करते वेळी अटीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. वर्धायांनी राखुन ठेवला आहे.
2. मंजूर दरपत्रक धारकाने उपरोक्त अटींची पुर्तता करुन देण्यासंबंधिची करारनामा दिल्यानंतर पुरवठा आदेश देण्यात येईल. तसेच त्यावेळी पुरवठा आदेश देणे किंवा न देण्याबाबतचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. वर्धा यांनी राखुन ठेवलेला आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क. )
जिल्हा परिषद,वर्धा

**SCHEDULE "A"**

मी खालील सही करणार निविदा धारक श्री/ श्रीमती/मे.................................................................... या द्वारे असे निवेदन करतो, मी कोणत्याही शासकीय /निमशासकीय कार्यालयाकडून BLACK LISTED झालेल्या नमूद निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर BLACK LISTED असल्याचे आपल्यास निदर्शनास आल्यास माझेवर नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस पात्र राहील.

निविदा धारकाची सही

नाव व पत्ता

**SCHEDULE *B***

**महिला व बाल कल्याण विभाग**

**जिल्हा परिषद वर्धा**

पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्यांच्या कंपणीचे नाव व मॉडेल नमूद करण्यासाठी

---

ती,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकरी,**

**जिल्हा परिषद वर्धा.**

**विषय :- पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्यांच्या कंपनीचे नाव व मॉडेल नमूद करण्याबाबत.**

**उपरोक्त** विषयांकीत पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्यांच्या कंपनीचे नाव व मॉडेल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | साहित्याचे वर्णन |
|---|---|
| | **As per specifications given in the tender :-** |
| १. | **Item to be supplied :-** |
| २. | **Name of company :-** |
| ३. | **Model:-** |

**निविदा धारकाची स्वाक्षरी , शिक्का**

**पूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक**

**दिनांक :-**

**ठिकाण :-**

## माहला व बाल कल्याण विभाग,जिल्हा परिषद, वर्धा
## निविदा सुचना क्रमांक-१ प्रथम वेळ

महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद,वर्धा अंतर्गत जिल्हा परिषद सेस फंड योजनेअंतर्गत अंगणवाडी ना (प्लॉस्टीक खुर्ची) पुरविणे करीता निविदा प्रसिध्द केली आहे. निविदा सादर करण्याचा दिनांक / /२०२५ ते दिनांक / /२०२५ पर्यत असुन निविदा दिनांक दिनांक / /२०२५ रोजी दुपारी २-०० वाजता उघडणेत येईल

विस्तृत माहिती **www.zpwardha.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.तसेच कार्यालय प्रमुख उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), महिला व बाल कल्याण जिल्हा परिषद वर्धा येथे सुध्दा माहिती पहावयास मिळेल

(मनिषा कुरसंगे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
जिल्हा परिषद, वर्धा